# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः 17.09.2024** **वारः मंगळवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज ओडिशाच्या दौऱ्यावर, भुवनेश्वर इथं राज्य सरकारच्या सुभद्रा योजनेचा प्रारंभ करणार,
2. देशभरात आजपासून 'स्वच्छता ही सेवा अभियान' राबवलं जाणार; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपातर्फे सेवा पंधरवड्याचंही आयोजन,
3. आठव्या भारत जल सप्ताह 2024ला आजपासून नवी दिल्लीत प्रारंभ,
4. महाराष्ट्रात गणेशोत्सवाच्या आनंदपर्वाची आज विसर्जन मिरावणुकीनं सांगता आणि
5. आशियाई करंडक हॉकी स्पर्धेच्या अंतिम फेरीत आज भारत आणि चीन यांच्यात लढत.

**मोदी ओडिशा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज ओडिशाच्या दौऱ्यावरअसून आज ते भुवनेश्वर इथं राज्य सरकारच्या सुभद्रा योजनेचा प्रारंभ करणार आहेत. सुभद्रा योजना हा ओडिशा सरकारचा सर्वात मोठा महिला-केंद्रित उपक्रम आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून एक कोटी महिलांना आर्थिक मदत देण्याचा उद्देश आहे. त्याअंतर्गत 21 ते 60 वर्षे वयोगटातल्या पात्र लाभार्थींना पाच वर्षांच्या अवधीत 50 हजार रुपये मिळणार आहेत. आधारशी संलग्न थेट लाभ हस्तांतरणाची सुविधाअसलेल्या लाभार्थींच्या बँक खात्यांवर दर वर्षाला 10 हजार रुपये दोन समान हप्त्यांमध्ये वितरित केले जातील.

या उपक्रमाचा प्रारंभ करताना पंतप्रधान मोदींच्या हस्ते 10 लाखांहून अधिक महिला लाभार्थींना पहिला हप्ता जारी करण्यात येणार आहे. या दौऱ्यात पंतप्रधानांच्या हस्ते 2 हजार 800 कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या रेल्वे प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पणही करण्यात येणार आहे. तसंच जवळपास एक हजार कोटींच्या राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांची कोनशिलाही त्यांच्या हस्तेबसवण्यात येईल त्याशिवाय प्रधानमंत्री आवास योजनेच्या शहरी लाभार्थ्यांशीही ते संवाद साधतील.

**स्वच्छता ही सेवा**

यंदाच्या 'स्वच्छता ही सेवा' अभियानाला आजपासून देशभरात सुरुवात होत असून ते 2 ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे. 'स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता' अशी यावर्षीच्या या अभियानाची मुख्य संकल्पना आहे. या अभियानात पर्यटनस्थळं, सार्वजनिक इमारती, व्यावसायिक जागा, पाणवठे, प्राणी संग्रहालयं,अभयारण्यं तसंच सामुदायिक आणि सार्वजनिक शौचालयं अशा विविध ठिकाणांच्या स्वच्छतेच्या मोहिमा हाती घेण्यात येणार आहेत. या अंतर्गत केंद्र सरकारची सर्वमंत्रालयं आणि राज्यं लोकसहभागातून विविध उपक्रमांच्या आयोजनाची आखणी करत आहेत. संपूर्ण समाज या दृष्टिकोनासह स्वच्छतेची निर्धारित ठिकाणं, श्रमदान, स्वच्छतेमध्ये लोक सहभाग आणि स्वच्छता मित्र सुरक्षा शिबिर या तीन प्रमुख गोष्टींवर भर देऊन यावर्षीचं स्वच्छता अभियान राबवलं जाणार आहे.

**नड्डा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भाजपातर्फे सेवा पंधरवडा राबविण्यात येणार आहे. त्यानिमित्त भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांच्या हस्ते सेवा पंधरवडा अंतर्गत रक्तदान शिबिराचं उद्घाटन होणार आहे. नड्डा पंतप्रधानांच्या जीवनावर आधारित प्रदर्शनाचंही उद्घाटन करतील.

**शंभर दिवस**

नरेंद्र मोदी सरकारने आपल्या तिसऱ्या कार्यकाळात शंभर दिवस पूर्ण केले आहेत. मोदी सरकारच्या ऐतिहासिक तिसऱ्या कार्यकाळातील पहिल्या 100 दिवसांमध्ये लोकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम करणारे अनेक महत्त्वाचे उपक्रम आणि निर्णय घेण्यात आले आहेत, आणि विकसीत Bharat@2047 यांचा भक्कम पायाभरणी केली आहे.

**जल सप्ताह**

आठव्या भारतीय जल सप्ताहाला आजपासून नवी दिल्लीत सुरुवात होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते भारत मंडपम इथं या कार्यक्रमाचं उद्घाटन होणार आहे. चार दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात 400 देशांतील दोनशे परदेशी प्रतिनिधींसह सुमारे चार हजार इतर प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. प्रदर्शनादरम्यान शंभराहून अधिक प्रदर्शक आणि स्टार्टअप्स पाणी क्षेत्रातील आपल्या कल्पना सादर करणार आहेत. आठवा भारत जल सप्ताह कार्यक्रम जगभरातील जलसंपत्ती क्षेत्रातील जागतिक पातळीवरील निर्णयकर्ते, संशोधक, तज्ञ, नवप्रवर्तक आणि भागधारकांकडून विचार आणि मते जाणून घेण्यासाठी एक जागतिक व्यासपीठ म्हणून काम करेल. 'सर्वसमावेशक जलविकास आणि व्यवस्थापनासाठी भागीदारी आणि सहकार्य' असं या कार्यक्रमाचं सूत्र आहे. पंचायती राज मंत्रालय या कार्यक्रमात भागीदार मंत्रालय म्हणून सहभागी होणार आहे. आठव्या भारतीय जल सप्ताहात देशभरातील ग्रामपंचायतींकडून जल व्यवस्थापनातील सर्वोत्तम पद्धतींचे प्रात्यक्षिक दाखविले जाणार आहे.

**हरियाणा विधानसभा**

हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा काल अखेरचा दिवस होतं. काल एकूण 190 उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. त्यानंतर आता 1031 उमेदवार रिंगणात राहिले आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी पंकज अग्रवाल यांनी दिली. राज्यातील सर्व 90 जागांसाठी येत्या 5 ऑक्टोबर रोजी मतदान होणार असून 8 ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे.

**गणेश विसर्जन तयारी**

महाराष्ट्रात गणेशोत्सवाच्या आनंद पर्वाची आज अनंत चतुर्दशीला सांगता होत आहे. आपल्या लाडक्या गणरायाला वाजत गाजत, उत्साहात निरोप देण्यासाठी गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांनी जय्यत तयारी केली आहे. प्रशासनानंदेखील ठिकठिकाणी विसर्जनासाठी कृत्रिम हौद उभारले असून रस्त्यांची दुरुस्ती, वीजयंत्रणा, रुग्णवाहिका, विसर्जन मार्गांचं सुशोभीकरण यासह अन्य व्यवस्था सज्ज ठेवली आहे. पोलिस यंत्रणाही सुरक्षा व्यवस्था आणि वाहतूक नियंत्रणासाठी दक्ष आहे. गणेशोत्सव पर्यावरणपूरक ठरावा म्हणून विसर्जनाच्या ठिकाणी निर्माल्य कलश ठेवण्यात आले आहेत; तसंच मूर्ती संकलन केंद्रं स्थापन करण्यात आली आहेत. पुण्यातली गणपती विसर्जन मिरवणूक तर वैशिष्ट्यपूर्ण आणि म्हणूनच संपूर्ण राज्याचं लक्ष लागून राहिलेली. आज सकाळी दहा वाजता पुणे महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले महात्मा फुले मंडईतल्या लोकमान्य टिळकांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करतील आणि त्यानंतर विसर्जन मिरवणूकीला सुरुवात होईल.

**हैदराबाद मुक्तीसंग्राम दिन**

हैदराबाद मुक्ती संग्राम दिनानिमित्त आज तेलंगणमध्ये विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. 1948 मध्ये आजच्याच दिवशी हैदराबाद संस्थान भारतात विलीन झालं. हैदराबाद मुक्ती संग्राम दिनानिमित्त केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयातर्फे सिकांदारबादमध्ये भव्य कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय मंत्री जी किशन रेड्डी यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. दुसरीकडे राज्य शासनाच्या वतीनं आजचा दिवस प्रजा पालन दिनोत्सव म्हणून साजरा करणार आहे. मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांच्या हस्ते हैदराबादमध्ये ध्वजारोहण होणार आहे.

**मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन**

महाराष्ट्रात प्रामुख्यानं मराठवाड्यातील विविध जिल्ह्यातही आज हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथल्या सिद्धार्थ उद्यानात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज ध्वजारोहण होणार आहे. नांदेडमधे पालकमंत्री गिरीश महाजन, हिंगोलीत पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण होणार आहे.

**ई लिलाव**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळालेल्या भेटवस्तूंचा ई-लिलाव आजपासून सुरू होणार आहे. केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी देशवासियांना ई-लिलावात सहभागी होण्याचं आवाहन केलं आहे. या लिलावाद्वारे मिळणारा निधी नमामि गंगे योजनेसाठी वापरण्यात येणार आहे. यावर्षी लिलावाचा सहावा हप्ता असून सुरुवातीला 2019 मध्ये या प्रकारची सुरुवात करण्यात आली होती. लोक आजपासून आपल्या आवडत्या स्मृतिचिन्हासाठी बोली लावू शकतात. ऑनलाइन लिलाव 2 ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहे.

**नौदल परिषद**

नौदल कमांडर परिषदेची 2024 साठीची दुसरी परिषद आजपासून नवी दिल्ली इथं सुरू होत आहे. नौदल कमांडर्समधील महत्त्वाच्या सामरिक, आणि प्रशासकीय मुद्द्यांवर चर्चा घडवून आणणारी ही परिषद म्हणजे सर्वोच्च पातळीवरील द्विवार्षिक कार्यक्रम आहे.

चार दिवसीय परिषदेचा प्रारंभ नौदलप्रमुखांच्या बीजभाषणानं होणार आहे. या परिषदेदरम्यान संरक्षणमंत्री राजनाथ सिंह गुरुवारी नौदलाच्या कमांडर्सना राष्ट्रीय सुरक्षा आणि आगामी काळातील अपेक्षा याच्याशी संबंधित मुद्द्यांवर संबोधित करण्याची शक्यता आहे.

**बॅनर्जी**

पश्चिम बंगाल सरकारनं आंदोलक कनिष्ठ डॉक्टरांच्या चारपैकी तीन मागण्या मान्य केल्या आहेत, असं मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी म्हटलं आहे. काल रात्री कालीघाट इथल्या निवासस्थानी कनिष्ठ डॉक्टरांची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना ममता बॅनर्जी म्हणाल्या की, डॉक्टरांची मागणी लक्षात घेऊन कोलकात्याचे पोलिस आयुक्त विनीत गोयल यांना हटविण्यात येईल. पोलीस दलातील बदल आज दुपारी अधिसूचनेद्वारे लागू करण्यात येणार आहेत. दरम्यान कनिष्ठ डॉक्टरांनी आपल्या कामावर रुजू व्हावं, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

**हॉकी**

आशियाई करंडक हॉकी स्पर्धेच्या अंतिम फेरीत आज भारताचा सामना यजमान चीनशी होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी साडेतीन वाजता सुरू होईल. भारतीय संघानं काल दक्षिण कोरियावर दणदणीत विजय मिळवत स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. साखळी फेरीतील सर्व सामने जिंकून भारतीय हॉकी संघ आतापर्यंत स्पर्धेत अपराजित राहिला आहे. 2011, 2016, 2018 आणि 2023 मध्ये विजेतेपद पटकावणारा भारतीय संघ आज पाचव्यांदा विजेतेपद मिळवण्यासाठी कसून प्रयत्न करेल.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.

#